# धडा पाठ 24

## मराठी शिक्षक

गोखले : सर, मी आत येऊ का?

मुख्याध्यापक : या गोखले या. कशी काय वाटली आमची शाळा? आवडली का? आणि तुमचं काम काय म्हणतंय? अरे शंकर, दोन कप चहा पाठवून दे लवकर!

गोखले : शाळा तर खूप आवडली आणि सर तुम्हाला मराठी छान बोलता येतंय की।

मुख्याध्यापक : अहो, गोखले, मी उत्तर कर्नाटकातला. शिक्षणही तिथंच झालं. आता गेली पंचवीस वर्षं मी इथं पुण्यात आहे. म्हणून मराठी येतं. अर्थात तुमच्याइतकं नाही. अजूनही अधूनमधून कन्नड शब्द येतात. गेली दहा वर्षे या कर्नाटक हायस्कूलचा हेडमास्तर आहे. पुन्हा एकदा मातृभाषेच्या सेवेची संधी मिळालीय.

गोखले : सर, थोडी अडचण आहे. मला कन्नड येतं ते बोलण्या समजण्यापुरतं! लिहायला वाचायला येत नाही. इथं मी मराठीचा शिक्षक म्हणून नेमलो गेलोय. पण मुलं सारी कन्नडभाषिक आहेत. बाकी सारे विषय कन्नडमधून शिकतात. त्यांना मराठी शिकताना फार अडचणी येतात.

मुख्याध्यापक : अहो गोखले, ह्या मुलांना

## मराठी शिक्षक

गोखले : सर, क्या मैं अंदर आऊँ?

मुख्याध्यापक : आइए गोखले जी आइए। आपको हमारी पाठशाला कैसी लगी? अच्छी लगी क्या? और आपका काम कैसे चल रहा है? अरे शंकर, जल्दीसे दो कप चाय भिजवाना।

गोखले : पाठशाला तो बहुत अच्छी लगी और सर आप को तो मराठी बहुत अच्छी बोलनी आती है।

मुख्याध्यापक : अरे गोखले जी, मैं मूलतः उत्तर कर्नाटक का। शिक्षा भी वहीं हुई। अब गए पच्चीस सालसे यहाँ पुणे में हूँ। इसलिए मराठी आती है। पर आप की तरह नही। अब भी यहाँ-वहाँ कन्नड़ शब्द आ जाते हैं। पिछले दस सालोंसे कर्नाटक हाइस्कूल का हैडमास्टर हूँ। एक बार फिर मातृभाषा की सेवा करने का अवसर मिला है।

गोखले : सर थोड़ी कठिनाई है। मुझे कन्नड़ तो आती है लेकिन सिर्फ बोलने समझ ाने तक। लिखना, पढ़ना नहीं आता। यहाँ मैं मराठी का शिक्षक नियुक्त किया गया हूँ। पर सभी बच्चे कन्नड़ भाषी हैं। (वे) बाकी के सब विषय कन्नड़ माध्यम से पढ़ते हैं। उन्हें मराठी सीखने में काफी दिक्कतें आती हैं।

मुख्याध्यापक : गोखले, इन बच्चों को मराठी

मराठी अनिवार्य भाषा म्हणून शिकायची आहे. ती या प्रांतात राहतात तेव्हा त्यांना इथली भाषा आलीच पाहिजे.

गोखले : ते खरं आहे. पण त्यासाठी खास तेवढ्यासाठी तयार केलेली पुस्तकंही हवीत. मला अजून तशी पुस्तकं मिळाली नाहीत. शिवाय मला कन्नड भाषा नीट येत नाही. मला जर चांगलं कन्नड येईल तर या विद्यार्थ्यांना मराठी शिकवायल मदत होईल.

मुख्याध्यापक : पण मला वाटतं गोखले, 'बालभारतीनं' अमराठी मुलांना मराठी शिकविण्याकरीता पुस्तकं तयार केलेली आहेत. त्याबद्दल चौकशी करा. आणि इथं 'डेक्कन कॉलेजात' केंद्र सरकारची 'पश्चिम विभागीय भाषा केंद्र' नावाची एक संस्था आहे. तिथंही चौकशी करा. शिवाय 'महाराष्ट्र राज्यभाषा संचालनालयाशी' संपर्क साधा. अरे हो, चहा घ्या.

गोखले : उगीचच त्रास घेतलात. सर, पण माझं कन्नड शिक्षण?

मुख्याध्यापक : अरे तेच तुम्हाला आता सांगणार होतो. म्हैसूरला केंद्र सरकारच्या 'भारतीय भाषा संस्थान'चे 'दक्षिण विभागीय भाषा केंद्र' आहे. तिथं चारही दक्षिण भारतीय भाषा-तमिळ, तेलुगू, कन्नड, मलयाळम या शिकवल्या जातात. हा दहा महिन्यांचा कोर्स आहे. तिथं हायस्कूल-शिक्षकांना कुठल्याही एका भाषेच्या प्रशिक्षणासाठी पाठवता

येतं. तुमची इच्छा असेल तर संस्थेतर्फे

अनिवार्य भाषा के रूप में सीखनी है। वे इस राज्य में रहते हैं इसलिए उन्हें यहाँ की भाषा आनी ही चाहिए।

गोखले : यह तो सच है। लेकिन इसके लिए विशेषरूप से तैयार की गई पुस्तकें चाहिए। मुझे तो ऐसी पुस्तकें नही मिली हैं। इसके अलावा, मुझे कन्नड भाषा अच्छी तरह नहीं आती। यदि मुझे कन्नड भाषा अच्छी तरह आती है तो इन विद्यार्थियों को मराठी सीखाने में मदद होगी।

मुख्याध्यापक : पर गोखले जी, मुझे लगता है कि 'बाल भारती' ने अमराठी बच्चों को मराठी सिखाने के लिए कुछ पुस्तकें तैयार की हैं। उनके बारे में पता कीजिए और यहाँ 'डेक्कन कालेज' में केंद्र सरकार की 'पश्चिम विभागीय भाषा केंद्र' नाम की एक संस्था है। वहाँ भी पूछताछ कीजिए। इसके अलावा 'महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालय' से भी संपर्क कीजिए। अरे हाँ, चाय लीजिए।

गोखले : आपने बेकार ही कष्ट लिया। हाँ सर पर मेरा कन्नड़ शिक्षण?

मुख्याध्यापक : वही आप से कहने जा रहा था। मैसूर में केंद्र सरकार के 'भारतीय भाषा संस्थान' का 'दक्षिण विभागीय भाषा केंद्र' है। वहाँ दक्षिण भारत की चारों भाषाएँ जैसे तमिळ, तेलुगू, कन्नड़ और मलयाळम सिखाई जाती हैं। यह दस महिनों का पाठ्यक्रम है। वहाँ हाईस्कूलों के शिक्षकों को किसी एक भाषा में प्रशिक्षण के लिए प्रति नियुक्त

किया जा सकता है। यदि आपकी इच्छा हो तो मैं संस्था की ओर से आपको वहाँ

तुम्हाला कन्नड शिकण्यासाठी पाठवण्याची मी शिफारस करीन.

गोखले : वा सर, तुम्ही माझे दोन्ही प्रश्न सोडवलेत. मी 'महाराष्ट्र राज्यभाषा संचालनालय', 'बालभारती' तसेच 'डेक्कन कॉलेजा'त कन्नड भाषिकांना मराठी शिकवण्यासंबधी पुस्तकांची चौकशी करतो. शिवाय तुम्ही कृपा केलीत तर वर्षभरात मला कन्नडही उत्तम शिकता येईल.

मुख्याध्यापक : अहो गोखले, यात माझी कसली कृपा! आपल्या शाळेसाठी ते आवश्यक आहेच. आणि तुम्हीही उत्साही आहात. तुमचा उत्साह असाच राहो. मी पाहतो आणखी तुम्हाला काय मदत करतां येते ते.

गोखले : धन्यवाद सर. येतो. तासाची वेळ झाली.

मुख्याध्यापक : बरं आहे. पुन्हा भेटू तर।

कन्नड सीखने के लिए भेजने की सिफारिश करूँगा।

गोखले : वाह सर! आपने मेरे दोनोंही प्रश्नों का समाधान कर दिया। मैं राज्य-भाषा निदेशालय, 'बालभारती' और 'डेक्कन कॉलेज' में कन्नड भाषियों को मराठी सिखाने के लिए पुस्तकों के बारे में पूछूँगा। इसके सिवाय यदि आपकी कृपा रही तो सालभर में मैं कन्नड़ अच्छी तरह सीख सकूँगा।

मुख्याध्यापक : अजी गोखले जी, इस में मेरी कृपा कैसी? अपने स्कूल के लिए यह आवश्यक ही है। और आप भी उत्साही हैं। आपका उत्साह इसी तरह बना रहे। मैं देखता हूँ कि आपको और मदद कैसे करूँगा।

गोखले : धन्यवाद! चलता हूँ। कक्षा का समय हो गया है।

मुख्याध्यापक : ठीक है। अच्छा फिर मिलेंगे।

शब्दार्थ

| | |
|---|---|
| मी आत येऊ का? | क्या मैं अंदर आ सकता हूँ? |
| कशी वाटली | कैसी लगी |
| पाठवून दे | भेज दो |
| तुमच्याइतकं | तुम्हारे जितना |
| अडचणी | कठिनाइयाँ, अड़चनें |
| बोलणे | बोलना |
| समजणे | समझना |
| समजण्यापुरतं | समझने तक |
| लिहिणे | लिखना |
| वाचणं | पढ़ना |
| आलीच पाहिजे | आनी ही चाहिए |
| तशी पुस्तके | उस तरह की किताबें |
| चौकशी | पूछताछ |

| | |
|---|---|
| उगाच | बिना कारण के |
| सोडवणे | सुलझाना, छुड़ाना |
| उत्तम | अच्छा |
| कृपा | मेहरबानी, कृपा |
| उत्साही | उत्साह से भरपूर, उत्साहित |

## अभ्यास

I धडा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) मुख्याध्यापक मराठी चांगली का बोलू शकत होते?
2) श्री. गोखलेंची काय अडचण होती?
3) अमराठी मुलांना मराठी शिकविण्यासाठी कोणी पुस्तके तयार केली आहेत?
4) डेक्कन कॉलेजात कोणती संस्था आहे?
5) म्हैसूरला केंद्र सरकारची भाषेसंबंधी कोणती संस्था आहे?
6) दक्षिण भारतीय भाषा शिकविण्याचा कोर्स किती महिन्यांचा आहे?

II धडा वाचून खाली दिलेली वाक्ये पूर्ण करा.

1) मी गेली दहा वर्षे या कर्नाटक ......... चा ........ आहे.
2) पुन्हा एकदा ........ सेवेची ........ मिळाली.
3) मला कन्नड येतं ते ......... ........ पुरतं!
4) बालभारतीने ......... मुलांना ....... शिकवण्याकरीता पुस्तकं तयार केलेली आहेत.

III एखाद्या विधानाला अनेक प्रकारचे प्रतिसाद मिळतात. खाली दिलेल्या प्रत्येक विधानाला आणखी तीन तीन प्रतिसाद लिहा.

1. काय कशी काय वाटली शाळा?
हं. ठीक आहे.
उत्तम! फारच चांगली आहे शाळा!
इथली शिस्त फार चांगली आहे.
इथून तिथून सगळ्या शाळा सारख्याच!
इतकी भरमसाठ फी घेतात!

2. इथे मराठी अनिवार्य भाषा म्हणून शिकवतात.
का? असलेल्या भाषा कमी होत्या?
इंग्रजीशिवाय दुसरी भाषा हवी कशाला?
मराठी आल्यानं काय मिळणार आहे?
मराठी तर यायलाच हवं.

3. ही शाळा मोठी आहे.
कसली आलीय मोठी?
नुसती शाळाच मोठी. शिस्त अजिबात नाही.
नसायला काय झालं? मुलांकडून भरमसाठ फी घेतात.
नुसती मोठीच नाही. छानही आहे.

IV कंसातील क्रियापदांची योग्य रूपे वापरून वाक्ये पूर्ण करा.

1) सासूबाईंनी ........ ......... गोष्ट सांगितली. (पड)
2) त्यानं घरात पाऊल ........ घर उजळलं. (टाक)
3) उद्या ......... माझ्या वह्या घेऊन ये. (ये)
4) तो रोज सकाळी भूपाळी ........ असतो. (गा)
5) ती रात्री ....... ....... दिवसभरात काय काय झालं ते त्याला सांगते (जेव)
6) तो ....... ....... मला म्हणाला "किती सुंदर दिसतेस तू!" (हस)
7) तो ...... ....... एकदम थांबला. (बोल)
8) घरातून बाहेर ....... जग कसं समजणार? (पड)
9) ते पुस्तक ......... माझं आयुष्यच बदललं. (वाच)
10) ती ......... ....... एवढी मोठी झाली. (बघ)

V उदाहरणात दाखविल्याप्रमाणे 'जा' या क्रियापदाची योग्य रूपे वापरून खाली दिलेल्या वाक्यत्रयींचे सगळे संच पूर्ण करा.

*उदाहरण:* तो जातो. ती जाते. ते जाते.

1) तो गेला. .......... ..........
2) तो जाईल. .......... ..........
3) तो जाणार आहे. .......... ..........
4) तो जाणार होता. .......... ..........
5) तो जाणार असेल. .......... ..........
6) तो जातोय. .......... ..........
7) तो जात होता. .......... ..........
8) तो जात असेल. .......... ..........
9) तो गेलाय. .......... ..........
10) तो गेला होता. .......... ..........
11) तो गेला असेल. .......... ..........
12) तो जात असतो. .......... ..........
13) तो जात असे. .......... ..........
14) तो जाई.......... ..........
15) तो जायचा. .......... ..........

16) तो जात जाईल. .......... ..........

VI अधोरेखित शब्दाऐवजी कंसातील शब्दांचा वापर करून त्यासाठी, योग्य ते बदल करून नवी वाक्ये बनवा.

1) घर मिळेल तेव्हा मी तुला सांगीन. (की)
2) मोठा पाऊस आल्यावर माझी छत्री मोडली. (तेव्हा)
3) एवढा मोठा अपघात झाला पण मला काही झालं नाही. (तरी)
4) पाऊस पडेल म्हणून मी बाहेर गेले नाही. (कारण)
5) तुझं ऐकल्यामुळे माझे पैसे वाचले. (म्हणून)
6) पाऊस पडला की थंडी वाजते. (तर)
7) झाडं तोडली तर पाऊस कमी होतो. (म्हणजे)
8) ठेकेदार आल्यावर बायका सिंहीणी होतात. (आणि)
9) ठेकेदार आले तरी झाडं तोडू शकले नाहीत. (पण)
10) मी झोपडीत शिरल्यावर थक्क झाले. (तेव्हा)

VII कंसांतले शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा.
(जळत्या, घातलेले, वाहणाऱ्या, झुलते, तळलेल्या, साचलेले, लिहीणारी, पेटती, रांगती, फाडणारी)

1) आम्ही तळ्यात .......... पाणी पाहिले.
2) सगळे कागद .......... मुलगी शाळेत गेली आहे.
3) आईनी .......... पुऱ्या खूप फुगलेल्या होत्या.
4) तू .......... लाकडाजवळ उभा राहू नकोस.
5) तो .......... सिगारेट तोंडात ठेवून हिंडत होता.
6) दिवाळीत नवीन कपडे .......... लोक आमच्या घरी आले.
7) रस्त्यावरून .......... पाण्यात मुलांनी होड्या सोडल्या.
8) आश्रमात जिकडे तिकडे .......... मुलं होती.
9) विद्यार्थ्यांनी प्रवासात .......... मनोरे पाहिले.
10) सर्वात उत्तम कविता .......... मुलगी वर्गात पहिली आली.

VIII पुढील अपूर्ण वाक्ये योग्य ते वाक्यांश जोडून पूर्ण करा.

1) जोपर्यंत कन्नड येणार नाही तोपर्यंत .......... .
2) मला कन्नड आलं की .......... .
3) विद्यार्थाना मराठी शिकायला त्रास होतो कारण .......... .
4) हेडमास्तरांनी मदत केली म्हणून .......... .
5) मला तुम्ही परवानगी दिलीत तर .......... .
6) मला मराठी जितकं चांगलं येतं तितकंच .......... .
7) ज्याप्रमाणे प्रत्येकाला कन्नड यायला हवी त्याप्रमाणे .......... .

8) जेव्हा मला कन्नड येईल तेव्हा .......... .
9) जसजसा मी कन्नड बोलू लागलो तसतसा .......... .
10) मी शाळेत आलो आणि .......... .

IX खालील शब्द योग्य क्रमाने लावून वाक्ये तयार करा.

1) शिक्षकांकडे, आम्हाला, करमलं, आमच्या, पाहुण्यांना, गोव्यात, शिकवणाऱ्या, इतिहास, आलेल्या, वर्गात, खूप.
2) पुण्यातल्या, मित्रांनी, पहिल्या, फिरल्या, बागा, पुण्याला, परवा, मोठ्या, नाटक, काल, सुहासच्या, पाहिलं, आलेल्या, मुंबईहून, रात्री.
3) झालेल्या, गप्पा, खुर्च्यांवर, टी.व्ही. समोर, आपापल्या, ठेवलेल्या, घरी, त्या, नंतर, आणि, पिऊन, बायकांनी, काल, टी.व्ही वर, नाटकाबद्दल, चहा, मारल्या, खूप, बसून, गेल्या.
4) उजेडात, गणपतीपुढे, झगमगत्या, म्हणतो, बाबांनी, आईनी, ठेवतो, केलेले, सजवलेल्या, मोहन, दिव्यांच्या, मोदक, आरती, आणि.
5) इत्यादी, डोलणारी, म्हैसूरहून, गोल गोल, खोलीत, खेळण्यांमधे, उड्या, आणलेला, मांडलेल्या, मोहनच्या, बाहुली, मारणारं, टांगा, लाकडाच्या, माकड, फिरणारी, होती, खेळणी, विमान.

X पुढे दिलेल्या क्रियापदांपासून वर्तमानकाळ, भविष्यकाळ, भूतकाळवाचक वाक्ये स्वतः तयार करा.

1) वहा 2) जळ 3) धाव 4) उगव 5) फिर

## पढ़िए और समझिए

पत्र I माननीय निर्देशक,
भाषा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
सचिवालय, मुंबई.

महोदय,

मी खाली सही करणार विनायक कृष्ण कुळकर्णी पुणे येथील सरकारमान्य कर्नाटक हायस्कूलमध्ये द्वितीय अनिवार्य भाषा मराठी या विषयाचा शिक्षक आहे.

महाराष्ट्र राज्यातील कन्नड अल्पसंख्याकांनी चालविलेली कन्नड माध्यमातून शिक्षण देणारी ही शाळा आहे. या शाळेत राज्य सरकारच्या धोरणानुसार मराठी हा विषय अनिवार्य द्वितीय भाषा म्हणून शिकवला जातो. याबाबत आपणाकडून मार्गदर्शनाची नम्र अपेक्षा बाळगत आहे.

1) कन्नड मातृभाषेच्या शाळेत मराठी ही द्वितीय भाषा म्हणून शिकण्यास योग्य अशी क्रमिक पुस्तके महाराष्ट्र सरकारने वा त्याच्या शिक्षण संचालनालयाने तयार केली आहेत का? असतील तर ती कोठे उपलब्ध होतील?
2) मी मराठी भाषिक असून मला कन्नड पूर्ण स्वरूपात शिकावयाचे आहे या संदर्भात अशा प्रकारच्या प्रशिक्षणासंबंधी आपण मला मार्गदर्शन कराल काय?

आपल्याकडून त्वरित उत्तराची अपेक्षा बाळगणारा,

आपला नम्र,
विनायक कृष्ण कुळकर्णी

23 मार्च 2005
कर्नाटक हायस्कूल
पुणे-2

पत्र II महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालय सचिवालय मुंबई

प्रिय महोदय,

आपले दिनांक 23 मार्च 2005 चे पत्र मिळाले. आपल्या अडचणींसंदर्भात आपण खालील ठिकाणी संपर्क साधू शकता.

1) कन्नडमधून मराठी भाषा शिकवण्यासाठी 'बालभारती' पुणे व 'पश्चिम विभागीय भाषा केंद्र' डेक्कन कॉलेज, पुणे यांच्याशी संपर्क साधावा. ते तुम्हाला तपशीलवार माहिती देतील.

2) कन्नडेतर भाषिकांना कन्नड शिकवण्याचे 10 महिन्यांचे प्रशिक्षण केंद्र सरकारच्या म्हैसूरस्थित 'भारतीय भाषा संस्थान'च्या 'दक्षिण विभागीय भाषा केंद्रा'तर्फे दिले जाते. या प्रशिक्षणासाठी अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना पूर्णपगारी पाठविण्याची तरतूद असून प्रशिक्षणकाळात केंद्र सरकारतर्फे शिष्यवृत्तीही मिळते. याच्या तपशीलाबाबत 'भारतीय भाषा संस्थान, मानसगंगोत्री - म्हैसूर 570 006' च्या संचालकांशी आपण संपर्क साधू शकता.

कळावे.

आपला,

सचिवालय,
मुंबई.

निदेशक भाषा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य यांच्याकरता

शब्दार्थ

| | |
|---|---|
| शिकवला जातो | सिखाया जाता है |
| शिकण्यास योग्य | पढ़नेलायक |
| त्वरित | जल्दी से |
| अडचणी | समस्या |
| खालील ठिकाणी | नीचे दिए गए स्थान पर |
| संपर्क साधणे | संबंध स्थापित करना |
| माहिती | जानकारी |
| तर्फे | की ओर से |
| शिष्यवृत्ती | छात्रवृत्ति |

I खालील प्रश्नांची पत्र I च्या आधारे उत्तरे द्या.

1) हे पत्र कोणाला लिहीले आहे?
2) या पत्रात कोणत्या शाळेचा उल्लेख केलेला आहे?
3) राज्यसरकारचे धोरण काय आहे?
4) लेखकाने कोणत्या गोष्टीची मागणी केली आहे?
5) लेखकाची मातृभाषा कोणती आहे?

II खालील प्रश्नांची पत्र II च्या आधारे उत्तरे द्या.

1) हे पत्र कोणाकडून पाठविण्यात आले आहे?
2) या पत्रात कन्नडमधून मराठी शिकविण्यासाठी कुठे संपर्क करायला सांगितले आहे?
3) कन्नडेतर भाषिकांना कन्नड शिकविण्याचा कोर्स कुठे चालविला जातो?
4) या कोर्ससाठी कोणाला पाठवले जाते व त्यांना काय सवलती असतात?
5) कन्नडेतर भाषिकांना कन्नड शिकविण्याच्या कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी कुणाशी संपर्क साधला पाहिजे?

III खाली दिलेल्या वाक्याच्या चार जोड्या नीट पहा. यात अनुक्रमे येणे, वाटणे, चालणे आणि लागणे यांचे दोन दोन अर्थ आहेत.
आणखी चार जोड्या तयार करा.

1. 1) मांजर घरात <u>येतं</u>. 2) मला मराठी <u>येतं</u>.
2. 1) रेखा चटणी <u>वाटते</u>. 2) काय कशी काय <u>वाटते</u> शाळा?
3. 1) सुनिताचा बाळ आता <u>चालतो</u>. 2) मला चहा <u>चालतो</u>.
4. 1) रमाच्या पायाला ठेच <u>लागते</u>. 2) मला सकाळी कॉफी <u>लागते</u>.

IV खालील वाक्ये नीट वाचा. अधोरेखित शब्दाऐवजी कंसातील योग्य तो शब्द घालून वाक्ये पुन्हा लिहा.
(परत, खरं, नीट, इतर, सक्तीची, खूप, सगळी, अवघड, केव्हा, खेरीज)

1) सारी मुलं वर्गात कन्नड बोलतात.
2) मराठी शिकताना फार अडचणी येतात.
3) मराठी ही अनिवार्य भाषा म्हणून शिकवली जाते.
4) मला कन्नड धड बोलताही येत नाही.
5) कन्नड मुलांना मराठी शिकवणे कठीण नाही.
6) तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.
7) याशिवाय इतरही उपाय आहेत.
8) पुन्हा एकदा यावं लागेल तुम्हाला!
9) कधी येणार आहात?
10) बाकी सारे विषय कन्नडमधून शिकवतात.

V 1) 'क्रम' शब्दापासून "क्रमिक" शब्द बनतो. याचप्रकारे खाली दिलेल्या शब्दांपासून नवे शब्द बनवा.
भाषा, इच्छा, संस्कृती, प्रांत, विचार, समाज, धर्म, सप्ताह, मानस
2) 'भारत' शब्दापासून 'भारतीय' शब्द बनतो, याचप्रकारे खाली दिलेल्या शब्दांपासून नवे शब्द बनवा.
विभाग, जात, प्रांत

VI हिंदी व मराठीमध्ये सारखे असलेले व या धड्यात आलेले सगळे शब्द शोधून लिहा।

VII हिंदीत भाषांतर करा आणि समर्पक शीर्षक द्या.

"शिक्षक हे संस्कृतीचे संरक्षक व संवर्धक असतात" असे जागतिक किर्तीचे तत्त्वज्ञ व आदर्श शिक्षक डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी म्हटले आहे. 'शिक्षक' या शब्दाचा अर्थ काय? शि म्हणजे शिव, शुभ, पवित्र, क्ष म्हणजे क्षमता, आणि क म्हणजे कर्तव्य, कर्म, कल्याण. म्हणजेच इतरांचे, विद्यार्थ्यांचे कल्याण करण्याची क्षमता असणारा शिव म्हणजे शिक्षक. म्हणजेच इतरांचे कल्याण करण्याची क्षमता असणारा आणि तेच ज्याचे कर्तव्य आहे, कर्म आहे तो शिक्षक. शिक्षक कसा असावा? व्रती असावा, व्यासंगी, बहुश्रुत, अभ्यासू, कष्टाळू असावा. नीतिमूल्यांचे पालन करणारा, सेवाभावी असावा. शिक्षकांबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी पाच सप्टेंबर (डॉ.राधाकृष्णन यांचा जन्मदिवस) हा दिवस 'शिक्षकदिन' म्हणून साजरा करतात आणि गुरूंबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी आषाढ शुद्ध पौर्णिमा 'गुरूपौर्णिमा' म्हणून साजरी केली जाते.

आपल्या भारतीय संस्कृतीत गुरूचे महत्त्व विशद केले आहे. गुरूला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. आई हा प्रत्येकाचा पहिला गुरू असतो. वडील दुसरे गुरू आणि आईवडिलांनंतर शिक्षक हा प्रत्येकाचा गुरू असतो. प्राचीन काळात धौम्यऋषी-आरूणी, द्रोणाचार्य-एकलव्य श्रीकृष्ण-अर्जुन, समर्थ रामदासस्वामी-शिवाजी महाराज असे अनेक आदर्श गुरूशिष्य होऊन गेले. या सर्वांनी आदर्श गुरू आणि आदर्श शिष्य कसा असावा

हे दाखवून दिले आहे. यांतील प्रत्येक जण खूप कष्ट करत होता, गुरूंची सेवा करत होता आणि असे करता करता शिकत होता. यातूनच गुरूशिष्य परंपरा निर्माण झाली. यांतील प्रत्येक गुरूने आपल्या शिष्याला शिकवून अशा योग्यतेचे बनविले की, त्याने आदर्श निर्माण केला. पूर्वीच्या काळात शिकण्यासाठी शिष्य गुरूकडेच राहायचा. या आदर्शापर्यंत येण्यासाठी प्रत्येकाने किती कष्ट घेतले असतील, शिकताना कायकाय सोसले असेल त्याचे त्यालाच ठाऊक! कारण कष्ट केल्याशिवाय विद्या मिळत नाही.

शिक्षकाने विद्यार्थाला असे ज्ञान द्यायला हवे की ज्यामुळे तो अज्ञान, अंधकार आणि बंधन यातून मुक्त होईल. आदर्श शिक्षक चारित्र्य, नीतिमत्ता, स्वावलंबन, धैर्य, इ.मूल्ये विद्यार्थ्यावर बिंबवितो. त्याला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी समर्थ बनवितो. त्याला घडवितो, आकार देतो. त्याच्यातील सुप्त कलागुणांच्या विकासाला वाव देतो. विद्यार्थ्याला केवळ परीक्षार्थी न बनविता खऱ्या अर्थाने विद्यार्थी बनवितो, ज्ञानार्थी बनवितो. केवळ अभ्यासक्रमातील विषय शिकवून न थांबता तो विद्यार्थ्याला जीवनावश्यक असे सर्व ज्ञान देत असतो. विद्यार्थ्याकडून अभ्यास करवून घेतो. शिक्षण ही दुतर्फी आणि जिवंत प्रक्रिया आहे. म्हणूनच आदर्श शिक्षक शिकविताना शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थ्यांनाही सामावून घेतो. त्यांना प्रश्न विचारतो. उत्तरे देण्यास प्रवृत्त करतो. त्यांना वाचन, लेखन, मनन, चिंतन करायला भाग पाडतो. विद्यार्थ्याच्या अडचणी, शंका आणि प्रश्न यांचे निरसन करतो. विद्यार्थ्यात कोणतीही कमतरता, दोष, दुर्गुण राहणार नाही याची काळजी घेतो. विद्यार्थ्याला परका मानत नाही. उलट त्याच्यावर पुत्रवत प्रेम करतो. त्याचे ज्ञानचक्षू उघडून त्याला जगाकडे बघायची आणि जगायची दृष्टी देतो. त्याच्यावर सहकार्य, सेवाभाव, बंधुभाव, सहिष्णुता ही मूल्ये बिंबवितो. आदर्श शिक्षक प्रत्येकाकडून काहीना काही गुण घेत असतो, शिकत असतो. मग समोरची व्यक्ती लहान असो अथवा मोठी. कारण आदर्श शिक्षक हा आदर्श विद्यार्थी असतो. तो विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करतो. म्हणूनच भारतीय संस्कृतीत शिक्षकाला (गुरूला) ब्रह्मा, विष्णू, महेशाची उपमा दिली आहे. गुरूला 'परब्रह्म' म्हटले आहे. म्हणूनच गुरू वंदनीय आहे. म्हटलंच आहे ना की, "शिक्षक हा विद्यार्थी परायण असावा, विद्यार्थी ज्ञानपरायण असावा आणि ज्ञान सेवापरायण असावे."

IX मराठीत भाषांतर करा.

भारत की राजभाषा हिंदी है। प्रत्येक राज्य की अपनी राज्यभाषा भी है जो उस राज्य में प्रथम भाषा के रूप में पढ़ाई जाती है और प्रशासन का कार्य भी उसी में चलाया जाता है। चूँकि सभी देशवासियों को किसी भी राच्य में रहने-कमाने का अधिकार है, इसलिए भारत के किसी भी क्षेत्र का निवासी अन्य क्षेत्र में रोज़ीरोटी के लिए जाता ही है। अपने मूल क्षेत्र से दूसरे क्षेत्र में जानेसे वहाँकी भाषा न समझने के कारण उसे कठिनाईयों का सामना करना पड सकता है। यदि भावी निवास-क्षेत्र की भाषा का भी ज्ञान हो तो काफी आसानी हो सकती है। इसलिए सभी भारतवासियों के लिए अपनी प्रथम भाषा के अतिरिक्त देश की किसी अन्य भाषा का ज्ञान यदि अनिवार्य

नहीं तो आवश्यक बन ही जाता है और हिंदी क्षेत्र के निवासियों को हिंदी तो सहज में ही प्रथम भाषा के रूपमें प्राप्त होती है, उन्हें अन्य क्षेत्र की भाषा का भी ज्ञान अर्थात्, लिखना, पढ़ना, समझना आना चाहिए।

जैसे-जैसे हम देश के विविध भाषाओं का समान करेंगे वैसे-वैसे देश की राजभाषा हिंदी के विकास को भी बल मिलेगा। हमें ये बात सदा याद रखनी चाहिए कि, हम भारतीय पहले हैं और मराठी, गुजराती अथवा अन्य भाषा भाषी बाद में। सच्चे भारतीय होने के लिए हमें भारत की समस्त भाषाओं का समान रूप से सम्मान करना चाहिए। ऐसा करके हम भारतीय एकता को मज़बूत करेंगे।

भाषा और संस्कृति का परस्पर गहरा संबंध है। भाषा से ही संस्कृति का विकास होता है। यदि हम अन्य राज्य की भाषा को सीखेंगे तो हमें उस राज्य की संस्कृति का भी ज्ञान हो जाएगा।

X खाली दिलेल्या शब्दांचा वापर करून मराठीत एक-एक वाक्य बनवा.
शाळा, लवकर, शिक्षण, हेडमास्तर, मातृभाषा, संधी, अडचण, अनिवार्य, प्रांत, कठीण

XI

1. आपण कन्नड भाषी आहात. मराठी शिकल्यावर आपण एका सुप्रसिद्ध कन्नड पुस्तकाचे मराठीत भाषांतर केले आहे. त्याच्या प्रकाशनार्थ अर्थसाहाय्यासाठी भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांना पत्र लिहा.

2. आपण प्रथितयश मराठी लेखक आहात. एका कन्नडभाषी उदयोन्मुख लेखकाने मराठीत लेखन केले आहे. त्याला त्याच्या प्रयत्नांबद्दल त्याचे कौतुक करणारे पत्र लिहा.